**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**प्रेस नोट दि.२२/०९/२०१९**
**दि.२१/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ६२०/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | आकाश साळुंखे,वय २१ वर्षे,रा.कात्रज,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/०८/२०१९ रोजी रात्रौ २३/४५ वा. विजय डेअरी जवळ,नविन गावठाण,कात्रज,पुणे येथील आमचे राहाते घरा जवळील सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन, फिर्यादी यांचे राहाते घरा जवळील सार्वजनिक रोडवर त्यांचेजवळील २१ हजार रू किचे दोन मोबाईल जबरी चोरी करुन चोरुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.डी.पाटील ९७०२९७९०९० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ५११/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५५ वर्षे,रा.वानवडी,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०९/२०१९ रोजी सकाळी ०५/४५ वा. सिक्रेट हाऊस टाऊन सोसायटी जवळ,शिवरकर रोड,वानवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ६०,०००/- रू किमतीचे जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. अे.ई.शेटे ९१५८८११६६६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ७७६/१९,भादविक २७९,३३७,३३८,३०४(अ),मोव्हेॲक्ट ११९/१७७ |
| **फिर्यादी** | नाना शेंडकर,वय-४३,रा.चांबळी,ता.पुरंदर,जि.पुणे |
| **आरोपी** | अज्ञात वाहन चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०९/२०१९ रोजी १२/०० वा. बोपदेव घाट येवलेवाडी,कोंढवा-बुद्रुक,पुणे येथे |
| **तपशिल** | कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचा चलुत भाऊ संजय रामचंद्र शेंडकर यांना जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. (सदरचा गुन्हा ०० नंबरने सासवड पोस्टे कडुन प्राप्त झाल्याने दाखल केला आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पवार ७०२०५८३०७८ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शि.नगर पो स्टे ४१३/१९,भादविक १४१,१४२,१४३,१४६,१४७,१४९,३५२,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | बलवीरहसिगं छाबडा,वय-६४ वर्षे,रा.लोहगाव रोड,पुणे |
| **आरोपी** | १५ ते २० इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०९/२०१९ रोजी १४/०० वा. पुणे महानगरपालिका येथील दुस-या मजल्यावरील मा. आतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालय,शिवाजीनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पुणे महानगरपालिका येथील दुस-या मजल्यावरील मा.आतिरिक्त यांचे कार्यालया जवळ त्यांचे टेडंरचे काम करीत असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांनी पुणे मनपा,पुणे शहर येथे ड्रेनेजचे टेंडर टाकल्याचा राग मनात धरुन,फिर्यादी व त्यांचे मुलाचे अंगावर धावून येवुन,त्यांना शिवीगाळ करून,जीवे मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. संदीप चव्हाण ९४२११६८२५७ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे २८७/१९,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३६ वर्षे,रा.४४०,नाना पेठ,पुणे |
| **आरोपी** | बँकेचे खातेधारक व पेटीएम धारक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०४/२०१९ रोजी ते दि.२०/०५/२०१९ रोजीचे दरम्यान ४४०,नाना पेठ,क्वॉर्टर गेट,पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | कोणीतरी बँकेचे खातेधारक व पेटीएम धारक इसम यांनी संगनमत करून,यातील फिर्यादी यांच्या मोबाईल मध्ये असलेले तिन्ही क्रेडीट कार्डची माहीती त्यांच्या परवानगी शिवाय व संमतीविना मिळवुन,नमुद कालावधीत मध्ये फिर्यादी यांचे तीन्ही क्रेडीट कार्डचा वापर करुन, पे.यु.पेमेंट,गुडगाव या वॉलेटला व पेटीएम आय.व्ही.आर.ई. कॉमर्स नोयडा या वॉलेटला रूपये वर्ग करून एकुण २,७२,८१०/- रुपये ऑनलाईन पध्दतीने ट्रान्झेक्शन करुन,फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे), व्हि.एस.साळुंखे ९८२३४१९९७० |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | को.पार्क पो स्टे २५८/१९,भादविक ४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम,वय-५० वर्षे,रा.बोट क्लब रोड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक व बँकेचा खातेधारक व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०३/२०१९ ते २७/०३/२०१९ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक व बँकेचा खातेधारक व्यक्तींनी फिर्यादी यांच्या मोबाईल नंबरवर फोन करून,आम्ही एका नामांकीत कंपनीचे अधिकारी व कर्मचारी बोलत आहे. तुम्हाला लकी ड्रॉ लागले असल्याचे भासवुन,त्यामध्ये एक चार-चाकी गाडी किंवा १२,८०,०००/- रुपये रोख रक्कम मिळतील असे सांगुन,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन सदर इसमांचे वेग-वेगळया बँकेतील खात्यावर,फिर्यादी यांना एकुण ७९,२५०/- रुपये भरावयास लावुन,त्यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक, जी.जे.माने ९८२३२२६८०३ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ६१८/१९,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क. ६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३६ वर्षे,रा.आंबेगाव-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईल व मेलधारक व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०८/२०१९ ते दि.०३/०९/२०१९ रोजीचे कालावधीत फिर्यादीचे राहाते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईल व मेलधारक व्यक्ती यांनी संगनमत करून,फिर्यादीस लग्नाचे आमिष दाखवुन त्यांना गिफ्ट पाठविल्याचे भासवुन,सदरचे गिफ्ट मिळवण्यासाठी फिर्यादी यांचेकडुन वेग-वेगळ्या कारणासाठी एकुण २८,५००/- रुपये एवढी रक्कम ऑनलाईन भरण्यास लावुन,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरी.(गुन्हे), विष्णु ताम्हाणे ९८२३१९५०९४ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड  पो स्टे  ३१७/१९,भादविक ४२०,४०६,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-४८ रा शिवनगरी एकलव्य कॉलेजच्या मागे कोथरुड |
| **आरोपी** | दोन इसम व एक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०९/२०१९ रोजी ०८/०० वा. इंछीरा अपार्टमेंट, गोमती हॉटेलचे मागे कोथरुड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद दोन इसम व एक महिला यांनी संगनमत करुन,फिर्यादी यांना पीएसीएल कंपनीत गुंतवणुक केल्यास मोठा परतावा मिळेल असे सागुन,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन,फिर्यादी यांचे कंपनीचे खात्यावरुन ७६,१७,५००/- रुपये घेवुन,सदरची रक्कम पीएस एल कंपनीत गुंतवणुक न करता,सदर इसमाने स्वतःचे फायदयाकरीता वापरुन,फिर्यादी यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मुंढे |

९

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी  पो स्टे  ८१२/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-२७ रा आंबेडकर वसाहत औध |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक तसचे पेटीएम अकाऊंटधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०७/२०१९ रोजी ते आजपोवतो ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक तसचे पेटीएम अकाऊंटधारक यांनी फिर्यादीस मोबाईल वर संपर्क साधुन,त्यांना मी आर्मी मध्ये नोकरीस असुन,तुम्हाला ओएलएक्सवर मोटार सायकल कमी किंमती मध्ये देतो असे सांगुन,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन,त्यांना ८५,१००/- रुपये ऑनलाईन ट्रान्सफर करण्यास सांगुन,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. (सदरचा गुन्हा सायबर पोस्टे कडुन ०० ने प्राप्त झाला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.निरी. (गुन्हे) गलांडे ९०११०३७७६२ |

१०

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी   पो स्टे  ५१२/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-६७ वर्षे धंदा-नोकरी रा-६०४ सनफ्लॉवर व्हॅली वानवडी पुणे |
| **आरोपी** | अज्ञात बँकेचे खातेधारक व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०७/२०१९ ते दि.२६/०७/२०१९ रोजीचे कालावधीत फिर्यादी यांचे राहते घरातुन ऑन लाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात बँकेचे खातेधारक व्यक्ती याने फिर्यादी यांना मेल पाठवुन,त्यांना वेग-वेगळी कारणे सांगुन,त्यांचा विश्वास संपादन करुन,फिर्यादी यांचे बँकेतील खात्यावर एकुण १ लाख ५० हजार रुपये ट्रान्सफर करायला भाग पाडुन,फिर्यादी यांची अर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे), सलीम चाऊस ८८०६१६६१०० |

११

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी  पो स्टे  ३१९/१९,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-४२ वर्षे,धंदा-शेती,रा.धानोरी रोड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०९/२०१९ रोजी सकाळी ०९/३० वा. आळंदी ते स्वारगेट, साठे बिस्कीट बीआरटी बस स्टॉप ते होमगार्ड कार्यालय,बीआरटी बस स्टॉप विश्रांतवाडी,पुणे येथे बस प्रवासा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे बसने प्रवास करीत असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे पॅण्टचे खिशात ठेवलेले २,००,०००/- रुपये रोख रक्कम फिर्यादी यांचे संमतीशिवाय त्यांचे पॅन्टच्या खिशातुन चोरुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. नरळे ८८८८३१८८११ |

**दि.२२/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे २८७/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | संदेश भळगट,वय-३३ वर्ष,रा.जीवननगर,चिंचवड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०९/२०१९ रोजी रात्रौ २१/३० वा.ते २१/४५ वा. चे दरम्यान गल्ली नं.१४,सुदरराव रेगे मार्ग प्रभात रोड, स्वरूप आपार्टमेट प्रभात रोड सोसायटीचे बाहेर एरंडवणे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मामा यांना भेटुन स्वरूप आपार्टमेट सोसायटीचे बाहेर येवुन,ओला टेक्सी बुक करण्यासाठी त्यांचा मोबाईल हातात घेऊन उभे असताना,सुंदरराव रेगे मार्गने त्यांचे पाठीमागुन आलेल्या दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचे पाठीमागुन येवुन,फिर्यादी यांचे हातातील मोबाईल जबरदस्तीने हिसका मारुन,ते मोटार सायकलवरून इनकम टॅक्स ऑफिसच्या दिशेने पळुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी.डी.मेटे ९६५७७१२१५३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**